वेचक

३५ लिटर डिझेल परस्पर विकले, दोघांवर गुन्हा

खेड (प्रतिनिधी) : खेड तालुक्यातील बोरज येथील कल्याण टोलवेज कंपनीतील कामगाराने ३५ लिटर डिझेल परस्पर विकल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अर्जुन लखनसिंग पाटीदार, संदीप कृष्णा घाटगे (४०, भरणेनाका, खेड) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अर्जुन लखनसिंग पाटीदार हा छावडा मराठा या कंपनीत जनरेटरच्या देखरेखीसाठी कामाला होता. कंपनीने जनरेटरसाठी आणलेले ३५ लिटर डिझेल पाटीदार याने कॅन भरुन टेम्पो ट्रॅव्हल्स चालक संदीप घाटगे याला दिले. या डिझेलची किंमत ३३९५ रुपये आहे. ही घटना २६ सप्टेंबर रोजी घडली. या प्रकरणी कंपनीचे रोनित अनिल इनरसकर (२९, खेड) यांनी खेड पोलीस स्थानकात दिली. त्यानुसार पोलिसांनी अर्जुन आणि संदीप यांच्या वर भादंवि कलम ३७९, ४११, ३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. याबाबतचा अधिक तपास पोलीस करत आहेत.

शिवीगाळ, मारहाण प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल

रत्नागिरी (वार्ताहर) : शिवीगाळ व मारहाण केल्याप्रकरणी संजय सुरेश निवळकर व वाहनचालक या दोघांवर रत्नागिरी ग्रामीण पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गणेश यशवंत निवळकर (रा. निवळी बावनदी) यांनी खबर दिली असून ते २७ सप्टेंबर रोजी एमआयडीसी येथील रॅम्पवर पराग सावंत यांच्या मालकीचा डंपर सव्हिसींगसाठी रॅम्पवर घेऊन आले असताना त्यावेळी तुषार सावंत डंपरवरील चालक लिंगाप्पा याच्याशी बोलत असताना निवळकर याने आपली बोलेरो गाडी ड्रायव्हरला बाजूला बसवून ती स्वतः चालवित रॅम्पवर आणली. त्यावेळी गाडीचा धक्का निवळकर यांना लागला.

जनतेच्या प्रश्नाकडे आजही प्रशासनाचे दुर्लक्ष, रस्त्यांची पुरती दुरवस्था

जनशताब्दीला राजापुरात थांबा, शहरात हवे आरक्षण केंद्र

शिवसेना खा. विनायक राऊत झोपा काढतायेत काय? जनतेचा सवाल

राजापूर (प्रतिनिधी)

राजापूरवासीयांचे रेल्वेशी निगडीत असलेले प्रश्न गेले कित्येक वर्षे प्रलंबित असून ते सोडविण्यात शिवसेना खासदार विनायक राऊत पूर्णपणे अपयशी ठरले आहेत. राजापूर रोड स्थानकात जनशताब्दी एक्स्प्रेसला थांबा मिळावा व राजापूर शहरात रेल्वेचे अधिकृत आरक्षण केंद्र सुरू करावे अशी गेले कित्येक वर्षे राजापूरवासीय मागणी करत आहेत. तर राजापूर आणि विलवडे रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या रस्त्यांची पुरती दुरावस्था झाली आहे. त्यामुळे आमचे लोकप्रतिनिधी म्हणून केंद्रात प्रतिनिधित्व करणारे शिवसेना खा. विनायक राऊत झोपा काढतायेत काय? असा संतप्त सवाल राजापुरातील जनतेतून उपस्थित केला जात आहे. रिफायनरी प्रकल्प विरोधकांना पाठबळ देण्यासाठी छुप्या बैठकांना उगवणाऱ्या खा. राऊत यांना मतदार संघातील या प्रश्नांकडे लक्ष द्यायला मात्र वेळ नाही अशी टिका जनतेतून होत आहे.

राजापूर रेल्वे स्थानकात जनशताब्दी एक्सप्रेसला थांबा द्यावा अशी राजापूरकरांची मागणी गेली कित्येक वर्षे प्रलंबीत आहे. कणकवली नंतर ही जनशताब्दी थेट रत्नागिरीत थांबत आहे. मध्ये सुमारे १५० किलोमीटरच्या अंतरात ती थांबत नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे. याबाबतची अनेक निवेदने प्रवाशांनी खा. राऊत यांना दिली.

मात्र आजपर्यंत कोणतीच कार्यवाही झालेली नाही. तर राजापूर शहरात रेल्वेचे अधिकृत आरक्षण केंद्र सुरू करावे अशीही राजापूरकरांची मागणी आहे. अन्य सर्व तालुक्यांमध्ये पोष्टात रेल्वेची अधिकृत आरक्षण केंद्र सुरू आहेत, मात्र राजापुरात नाही अशी परिस्थिती आहे. त्यामुळे आरक्षण करण्यासाठी राजापूर वासीयांना १६ किलोमीटर लांब असलेल्या राजापूर रेल्वे स्थानकावर जाऊन आरक्षण करावे लागत आहे. मात्र या मागणीकडेही दुर्लक्ष करण्यात आले आहे.

राजापूर तालुक्यात राजापूर, विलवडे आणि नव्याने निर्माण झालेले सौंदळ हॉल्ट स्टेशन अशी तीन स्थानके आहेत. राजापूर आणि विलवडे स्थानकावर पॅसेजरसह तुतारी, कोकण कन्या या गाड्या थांबतात, तर सौंदळ हॉल्ट स्थानकावर पॅसेंज थांबते, प्रवाशांची नेहमीच या तिन्ही स्थानकांवर त्या त्या गाडया पकडण्यासाठी गर्दी असते, मात्र या तीन्ही स्थानकांकडे जाणाऱ्या रस्त्यांची पुरती दुरवस्था झालेली आहे. राजापूर ते रेल्वे स्टेशन रोड व वाटूळ ते विलवडे रेल्वे स्टेशन रोडवरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. रेल्वेने सुखात येणाऱ्या प्रवाशांना या खड्डेमय रस्त्यातून कसरत करत घर गाठावे लागत आहे. तर खासगी वाहनांना अवास्तव भाडे मोजावे लागत आहे.

मात्र स्थानिक जनतेचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या शिवसेना आमदार आणि खासदारांना जनतेच्या या प्रश्नांचे काहीच पडलेले नाही अशी राजापूरकरांची अवस्था आहे. सध्या तर आपण किती निष्ठावान आहोत हे मातोश्रीला दाखवविण्यासाठी यांच्यात चढाओढ आहे. हीच चढाओढ जरा रेल्वेचे प्रश्न सोडविण्यासाठी, रस्ते करण्यासाठी आमदार आणि खासदारांनी दाखवावी अशी मागणी राजापूरवासीयांतून होत आहे.

भाजप प्रदेश सरचिटणीस निलेश राणे यांच्या मदतीमुळे एका गरीब रुग्णावर हृदय प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया यशस्वी

राजापूर (वार्ताहर)

भाजपा प्रदेश सरचिटणीस आणि माजी खासदार निलेश राणे यांच्या मदतीमुळे सिंधुदुर्ग तालुक्यातील पहिलीच हृदय प्रत्यारोपणची शस्त्रक्रिया यशस्वी झाली आहे. कुडाळ तालुक्यातील भिकाजी निर्गुण यांचेवर ठाणे जिल्ह्यातील जुपिटर हॉस्पिटल मध्ये हृदय प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया करण्यात आली.

या शस्त्रक्रियेचा एकूण खर्च चाळीस लाख रुपये सांगण्यात आला होता. परंतु निलेश राणे यांच्या पाठपुराव्यामुळे ते २० लाखात करून देण्यात आले. निलेश राणे यांनी तब्बल वीस लाखांचे बिल माफ करून दिले. अत्यंत गरीब अशा त्या रुग्णाला निलेश राणे साहेबांमुळे नवीन जीवदान प्राप्त झाले.

निलेश राणे यांनी केलेल्या मदतीबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे. निलेश राणे सांगण्यावरून या कामाचा पाठपुरावा राणे प्रतिष्ठान अध्यक्ष सलमान गांगु आणि शेखर राणे तसेच वैद्यकीय कोकण आघाडीचे अध्यक्ष डॉ. अमोल देसाई यांनी केला.

पंतप्रधान मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सागवे येथे भाजपच्या वतीने रक्तदान शिबीर

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सागवे येथे भाजपच्या वतीने रक्तदान शिबीर घेण्यात आले. याप्रसंगी भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते.

राजापूर (वार्ताहर)

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवडा अंतर्गत राजापूर भाजपाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या अनुषंगाने भाजप युवा मोर्चा राजापूर तालुका यांच्यावतीने काव्रादेवी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

काव्रादेवी कला क्रीडा मंडळ यांच्या सहभागाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरामध्ये सर्व ग्रामस्थ तसेच भाजपा युवा मोर्चा पदाधिकारी कार्यकर्ते यांनी रक्तदान हेच श्रेष्ठ दान समजून रक्तदान केले. यावेळी ४० ते ४५ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

यावेळी राजापूर भाजपा तालुका अध्यक्ष अभिजीत गुरव, उपजिल्हाध्यक्ष रवींद्र नागरेकर, महिला तालुकाध्यक्षा सौ. श्रुती ताम्हनकर, भाजप युवा मोर्चा राजापूर शहर अध्यक्ष संदेश आंबेकर, तालुका उपाध्यक्ष विनायक कुवेस्कर, सुदेश नार्वेकर, अरविंद लांजेकर, मोहन घुमे, सौ. गुंड्ये, श्रीमती राहटे, अंड. सुशांत पवार, आशीष मालवणकर तसेच सर्व भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते, काव्रादेवी कला क्रीडा मंडळ अध्यक्ष आशीष कुलकर्णी, उपाध्यक्ष अरविंद पनवेलकर, प्रमोद मंचेकर विद्याधर राणे, सेक्रेटरी मिलिंद मिस्त्री, आदी उपस्थित होते. शिबीर यशस्वी होण्यासाठी भाजपा पदाधीकारी व काव्रादेवी कला क्रीडा मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी मेहनत घेतली.

राजापुरात भाजप महिला मोर्चातर्फे नारी शक्तीचा सन्मान

राजापूर (वार्ताहर)

राजापूर भाजप महिला मोर्चाच्यावतीने आयोजित नारी शक्ती सन्मान कार्यक्रमाला उपस्थित नारी शक्ती व भाजपा महिला पदाधिकारी.

भारतीय जनता पार्टी राजापूर तालुका महिला मोर्चा यांच्या वतीने नवदुर्गा पुरस्कार वितरण कार्यक्रम श्री मंगल कार्यालय राजापूर येथे नुकताच पार पडला. यावेळी राजापूर शहर व राजापूर तालुक्यातील सामाजिक क्षेत्रांत काम करणाऱ्या सर्व नारी शक्तींचा या कार्यक्रमात सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाला जिल्हा महिला मोर्चा अध्यक्षा सौ. ऐश्वर्या ताई जठार, महिला मोर्चा सरचिटणीस सौ. शिल्पा मराठे, ओ. बी. सी. महिला जिल्हाध्यक्ष सौ. प्राजक्ता रुमडे, रत्नागिरी तालुका अध्यक्ष सौ. तनया शिवलकर, जिल्हा कार्यकारिणी सदस्या सौ. राजश्री मोरे, सौ. शीतल पटेल, भाजपा तालुका अध्यक्ष अभिजित गुरव, सरचिटणीस अड. सुशांत पवार, मोहन घुमे, महिला मोर्चा उपाध्यक्ष श्रीम. शीतल रहाटे, सौ. अनिता पांचाळ सौ. सोनाली केळकर, सौ.रेणुका गुंडये, सौ. रसिका कुशे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी राजापूर शहर व तालुक्यात सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या नारीशक्तींचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमात सहभागी राष्ट्र सेविका समिती राजापूर शाखा, गीता संस्था वर्ग गुजराळी, राजापूर महिला ढोल पथक, राजापूरातील महिला भजन मंडळे, या सर्व सन्मानित महिलांनी आपापल्या कार्यक्रमाचे सादरीकरण केले. भाजपा महिला तालुका अध्यक्षा सौ. श्रुती ताम्हनकर यांनी या कार्यक्रमाचे सुनियोजित, शिस्तबद्ध, असे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सौ. सुयोगा जठार यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम् राष्ट्रगीताने झाली.

खेडमध्ये ७ ग्रामपंचायतींच्या ५७ जागांसाठी ८२ उमेदवारी अर्ज दाखल

खेड (प्रतिनिधी) : खेड तालुक्यातील देवघर, तळघर, नांदगांव, आस्तान, सुसेरी, वडगांव बुद्रुक, असगणी या ७ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाच्या सार्वत्रिक निवडणूकीत एकूण ५७ जागांसाठी ८२ उमेदवार अर्ज दाखल झाले असून तळघर ग्रामपंचायतींच्या उमेदवाराचा उमेदवारी अर्ज अवैध ठरल्याने एकूण ८१ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे आहेत, जनतेतून सरपंच पदासाठी ७ ग्रा पमधून २१ प्रभागा मध्ये तब्बल ८२ उमेदवारांचे उमेदवारी अर्ज दाखल झाले होते.

लांजा शहरात महामार्गावर धुळीचे लोट

धुळीच्या त्रासामुळे लांजा शहरातील नागरिक, पादचारी आणि व्यापारी हैराण

लांजा (प्रतिनिधी)

महामार्गाच्या दुरवस्थेमुळे सध्या शहरात सर्वत्र धुळीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. या धुळीचा त्रास लांजातील नागरिकांबरोबरच व्यापारी वर्गाला सहन करावा लागत असून त्यांच्या मालाचे नुकसान होत आहे. त्यामुळे महामार्ग विभागाने याबाबत तातडीने कार्यवाही करून शहरातील रस्त्यांचे डांबरीकरण करावे अशी मागणी व्यापारी संघटनेचे पदाधिकारी खलील मणेर यांनी केले आहे.

लांजा शहरात महामार्गाची अतिशय दुरावस्था झाली आहे. मुळातच महामार्गावरून वाहनांची मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू असते. त्यात अवजड वाहनांमुळे धुळीच्या लोटच्या लोट हे महामार्गाच्या शेजारी असलेल्या दुकानात शिरतात. त्यामुळे व्यापाऱ्यांच्या मालाचे नुकसान होत असल्याचे चित्र आहे. धुळीच्या त्रासामुळे अनेकांना श्वसनाचे आजार होण्याची भीती व्यापारी वर्गातून व्यक्त केली जात आहे. यापूर्वी जानेवारी महिन्यात लांजा वासियांच्यावतीने या धुळीचा त्रास आणि महामार्गाच्या दुरावस्थे विरोधात आंदोलन छेडण्यात आले होते. त्यानंतर शहरातील रस्त्यांचे जाळे करण्यात आले होते.मात्र सहा महिन्यातच रस्त्यांची दुरवस्था झाली असून धुळीचा त्रास नव्याने निर्माण होत आहे. रात्रीच्या वेळी तर प्रचंड धुळीमुळे दुचाकीस्वारांना समोरचे काही दिसत नाही अशी परिस्थिती आहे.

महामार्ग विभागाने याबाबत तातडीने कार्यवाही करून मुंबई-गोवा महामार्गाचे पुन्हा एकदा डांबरीकरण करण्यात यावे अशी मागणीही मणेर यांनी केली आहे.

...तर सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे रस्त्यावर उतरून आंदोलन

जि.प.सेवानिवृत्त कर्मचारी सेवासमिती लांजा तालुका शाखा सभा

लांजा (प्रतिनिधी)

गेल्या सात वर्षापासून तालुक्यातील ५० सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाच्या फरक व गटविम्याची रक्कम प्राप्त झालेली नाही. अनेक प्रकारची बिलं देणे बाकी असून याबाबत सभेत नाराजी व्यक्त करण्यात आली. भविष्यात अशीच स्थिती राहिली तर सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी रस्त्यावर उतरुन आंदोलन करण्याचा निर्धार जि.प.सेवानिवृत्त कर्मचारी सेवासमिती लांजा तालुका सभेत करण्यात आला.

शहरातील शाळा नं. ५ येथे संघटनेची सभा तालुकाध्यक्ष मुबारक शेख यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सरचिटणिस विश्वास तळसंदेकर यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. संघटनेत आलेल्या नविन सभासदांचे यामध्ये विजय साळसकर, विनोद सावंत, मधुरा सरदेसाई, सूर्यकांत लांजेकर, मनीषा तेंडुलकर, अशोक कुंभार गुलाबपुष्प देवून स्वागत करण्यात आले. यानंतर अध्यक्षांच्या हस्ते वयोवृध्द सभासद श्री.गांधी गुरुजी, वैशाली अशोक पाध्ये, सेयोगिता सदाशिव पाध्ये यांचा सत्कार करण्यात आला.

संघटना कामाचा आढावामध्ये संघटनेच्या मार्फत करण्यात आलेल्या प्रलंबित प्रश्न आणि पाठपुरावा कामाचा आढावा अध्यक्ष मुबारक शेख यांनी सभागृहासमोर ठेवला. गेल्या सात वर्षापासून लांजा तालुक्यातील ५० सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाच्या फरकाच्या रकमेचा एकही हप्ता अजून पर्यंत दिला गेलेला नाही. तसेच गटविम्याची रक्कम गेल्या सात वर्षापासून दिली नाही. अनेक प्रकारची बिलं सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची देणे बाकी आहेत. याबाबत सभेत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. भविष्यात अशीच अवस्था राहिली, तर सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा निर्धार केला. त्यानंतर जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बोलावलेल्या सभेत तालुक्याच्यावतीने मांडलेल्या समस्या मांडण्यात आल्या. तसेच जिल्हाध्यक्ष बबन बांडागळे यांचे सोबत उपमुख्यकार्यकारी अधिकारी यांची घेतलेली भेट आणि सातव्या वेतन आयोगाचा एकही हप्ता न मिळालेल्या सभासदांचे अर्ज सादर केल्याचा वृतांत आणि लांजा गटविकास अधिकारी यांची घेतलेल्या भेटीचा वृत्तांत ठेवला. यावर सभागृहात भरपूर चर्चा करण्यात आली. सदर चर्चेत प्रामुख्याने प्रभाकर कोळवणकर, सूर्यकांत लांजेकर, यशवंत पाडावे, विनोद सावंत, विलास चाळके, विजय साळसकर, नमिता बारस्कर आदींनी सहभाग घेतला. १७ डिसेंबरच्या पेन्शनर डे बाबत चर्चा करण्यात येऊन नियोजनासाठी सभा लावण्याचे ठरले. सरचिटणिस विश्वास तळसंदेकर यांनी आभार मानले.

उत्तर मध्य रेल्वे

ई - प्रापण निविदा सूचना क्र. २२/ ६७ दिनांक २७.०९.२०२२

भारतीय राष्ट्रपतीच्या वतीने, प्रधान मुख्य सामग्री व्यवस्थापक, उत्तर मध्य रेल्वे, प्रयागराज (आयएसओ ९००१ : २०१५ प्रमाणित विभाग) हे खालील ई - प्रापण निविदा मागवीत आहेत.

अ. क्र.	निविदा क्र.	संक्षिप्त वर्णन	परिमाण	निविदा उपलब्धतेची तारीख
१	२०२२३५१७	कॉन्टॅक्टर फिल्टर ऑन-ऑफ/ऑडापाळन	संख्या ११	२५.१०.२०२२
२	५०१९५०२३ एफ	इंडस्ट्रियल ग्रेड फॅनलेस एम्बेडेड व्हॉक्स पीसी चा पुरवठा	संख्या ३७	२६.१०.२०२२
३	६०२२११७७	हायड्रन्ट कन्ट्रोल व्हॅल्व्ह ५० एमएम	संख्या १३४८	२६.१०.२०२२

टीप : वरील निविदांची संपूर्ण माहिती आयआरईपीएस वेबसाइट **https://www.ireps.gov.in** वर पाहता येऊ शकेल व तेथून डाऊनलोड करता येऊ शकेल. **1338/22 (AN)**

North central railways www.ncr.indianrailways.gov.in @CPRONCR @northcentralrailway

उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक

नोंदणीकृत कार्यालय : प्रेप गार्डन नं. २७, ३३ ए क्रॉस, १८ वा मेन, ६ वा ब्लॉक, कोरमंगला, बेंगळूरू - ५६०००५, कर्नाटका.
प्रादेशिक कार्यालय : ७ वा मजला, आनंदनिधी आयपी पार्क, अ. क्र. ८, खराडी - मुंढवा बायपास, गाव खराडी, पुणे - ४११ ०१४.

शुद्धिपत्रक

कर्जदार व सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी सदर सूचना देण्यात येत आहे की, **दि. २२.०९.२०२२** रोजी विझनेस स्टॅन्डर्ड व प्रहार या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध लिलाव सूचनेच्या **अनुक्रमांक १ ते ६** मध्ये नमूद मालमत्तांच्या लिलाव तारीख **१०.१०.२०२२** अशी प्रसिद्ध झाली आहे जी टाइपोग्राफिकल चूक असून त्यासंदर्भात लिलाव दिनांक **१९.१०.२०२२** अशी वाचण्यात यावी, समजण्यात यावी व गृहीत धरण्यात यावी. उर्वरित सर्व अटी व शर्ती तसेच लिलावाचे राखीव मूल्य व वेळ अपरिवर्तित राहतील.
त्याचबरोबर, **दि. २२.०९.२०२२** रोजी विझनेस स्टॅन्डर्ड व प्रहार या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध लिलाव सूचनेच्या **अनुक्रमांक ७ ते १३** मध्ये नमूद मालमत्तांच्या लिलाव तारीख **११.१०.२०२२** अशी प्रसिद्ध झाली आहे जी टाइपोग्राफिकल चूक असून त्यासंदर्भात लिलाव दिनांक **२०.१०.२०२२** अशी वाचण्यात यावी, समजण्यात यावी व गृहीत धरण्यात यावी. उर्वरित सर्व अटी व शर्ती तसेच लिलावाचे राखीव मूल्य व वेळ अपरिवर्तित राहतील.
दिनांक : २९.०९.२०२२ **सही/-**
ठिकाण : मुंबई **प्राधिकृत अधिकारी**

ठाणे महानगरपालिका, ठाणे

सा.बा विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील नौपाडा-कोपरी प्रभाग समितीच्या सार्व. बांधकाम विभागामार्फत ''स्थापत्य कामांची दुरुस्ती '' लेखाशिर्षका अंतर्गत राम गणेश गडकरी रंगायतन इमारतीची (सन २०२२-२३) करीता वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे या कामाकरिता नोंदणीकृत ठेकेदारांकडून ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत.ज्या निविदाकारांवर शासकीय, निमशासकीय, सार्व. उपक्रम, स्थानिक संस्था महानगरपालिका ई. मार्फत नोंदणी रद्द करणेबाबत/ काळ्या यादीत टाकणेबाबत कार्यवाही करणेत आली आहे अथवा प्रस्तावित आहे अशा निविदाकारांना निविदा भरता येणार नाही. निविदा सूचना व प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in वर दि.३०.०९.२०२२ ते दि.१४.१०.२०२२ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळ येथे दि.१४.१०.२०२२ रोजी सायं.१६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा दि.१७.१०.२०२२ रोजी स.११.०० वा. निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधीं समक्ष उघडण्यात येतील.
ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-नी- को/ ६१६/२२-२३ **सही/-**
दि:२९.०९.२०२२ कार्यकारी अभियंता
plsvisitourofficialweb-site ठाणे महानगरपालिका, ठाणे
www.thanecity.gov.in
संरक्षित रहा, कोरोना विषाणूंपासून सुरक्षित रहा !

मिरा भाईंदर महानगरपालिका
पाणी पुरवठा विभाग
स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता. जि. ठाणे - ४०११०१

जा. क्र. मनपा/ पापु / २८/२०२२-२३ दि. २९/०९/२०२२

// जाहिर फेर-निविदा सूचना //

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विविध कामांसाठी ऑनलाईन फेर-निविदा मागविणेत येत आहेत. फेर-निविदा सूचना व निविदा प्रपत्र **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर **दि. ०४/१०/२०२२ ते दि. १२/१०/२०२२ रोजी १२.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहणार आहेत. http://mahatenders.gov.in** च्या संकेतस्थळावर दि. **१२/१०/२०२२ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.**

जा.क्र. मनपा/जनसंपर्क/२७४/२०२२-२३ **सही/-**
दि. २९/०९/२०२२ **कार्यकारी अभियंता**
ठिकाण - भाईंदर **पाणी पुरवठा विभाग**
दि. २९/०९/२०२२ **मिरा - भाईंदर महानगरपालिका**

MAHAVITARAN Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.
e-TENDER NOTICE
e-bid offers are invited from eligible bidder for

e-Tender No. / Name of work / EMD / Tender Form Fee CE/BNDUZ/T-12/2022-23 / Est. cost of Tender:-₹ 719.41 Lakhs/Emd:- ₹7,19,410/Tender fee:- ₹ 11,800/-	Online Sale period & online Submission date
Supply, Erection, Testing & Commissioning of 33/11 KV 01 x 10 MVA Capacity **Nere Substation** at Panvel Dist. Raigad with laying Commissioning of 33 KV Incomer Feeder & 22 KV Distributer Feeders under INFRA II Left out works under Panvel Urban Division of Vashi Circle under Bhandup Urban Zone.	**28.09.2022 to 07.10.2022 Date of submission 07.10.2022 up to 17.00**

The e-tender document is being available on our website **www.mahadiscom.in/eTender/etender on 28.09..2022** Contact person, Exe. Engineer(I) Tel. No. 8879625111, 25667912, 25663982,83,84 MSEDC Ltd, Bhandup Urban Zone "Vidyut", L.B.S Marg, Bhandup(w) Mumbai-78. E-mail-**cebhandup1@gmail.com.**
CHIEF ENGINEER (BUZ)

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
SRM E-Tender Notice (RFx No.7000024804)

MSETCL invites digitally signed online bids for following tender through SRM E-tender process of MSETCL in two bid system from registered contractors, agencies on Mahatransco E-Tendering website **http://srmetender.mahatransco.in** for following works.

Sr. No.	Tender No & Description of Work			Due date & Time (Hrs) for submission & opening of Tender	
1	**Tender No. CELDK/ Maint/FM-36/2022-23**				
	Scope of Work : Annual contract of providing services of 2 no. ITI Electrician/Wireman against vacant post of Senior Technician (Trans. System) & 6 no. ITI electrician against vacant post of Assistant Technician (General) in maintenance section for various maintenance works at SLDC, Airoli.			**Download of Tender Documents Date : From 30.09.2022 to 06.10.2022**	
Estimated Cost (Rs.)	**EMD (Rs.)**	**Tender Fee (Rs) +GST @ 5% Extra**	**Closing Date (Submission)**	**Tender (Technical) Opening date**	**Commercial opening date**
25,05,671.68 Lakhs	25,057/-	525/-	06.10.2022 Up to 23:59 Hrs.	07.10.2022 11:00 am. (If possible)	10.10.2022 11:00 am. (If possible)

Contact Person : Additional Executive Engineer (Maint), State Load Dispatch Centre, Thane-Belapur Road. At & Post Airoli Navi Mumbai - 400708. Tel. no.8779963563/ 9320844448 /9323802683.
For further details visit our website **http://mahatransco.in**
1. Relevant portions of the Tender which the bidders have to fill online would be available on aforesaid website.
2. The bidder should submit their bids online, well in advance within aforesaid date & time. The scanned copy of EMD receipt and Tender Fee receipt should be submitted online along with the Bid.
3. The EMD amount and tender fees as indicated above should be paid online only. Bidder can pay through Credit Card or by their Axis bank Account (NEFT/RTGS) Transfer.
4. MSETCL will not be responsible for non-submission of bid due to website related problems.

Note :-All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tendering portal.
SD/-
(Juelee M. Wagh)
Chief Engineer (MSLDC), MSETCL, Airoli